# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची संधी

Estd. 1962
"A++" *Accredited by*
NAAC (2021) with CGPA 3.52

सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सीमाभागातील एकूण ८६५ गावातील जे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठामध्ये प्रवेश घेवू इच्छितात त्यांच्यासाठी शिवाजी विद्यापीठाने फी सवलत जाहीर केली आहे. यामध्ये अनुदानित अभ्यासक्रमांसाठी संपूर्ण ट्युशन फी व विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी २५% ट्युशन फी माफ करण्यात आली आहे. जे विद्यार्थी वसतिगृहासाठी प्रवेश घेवू इच्छितात त्यांच्याकरीता वसतिगृहाची फी माफ करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे अशा अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा दि.०८ मे ते दि.११ मे, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून त्याकरीता अर्ज करण्यासाठी दि.२९/०४/२०२३ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे व ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा नाही अशा अभ्यासक्रमांसाठी अंतिम मुदत यथावकाश कळविण्यात येईल. तरी सीमाभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्यात यावा.

सीमाभागातील विद्यार्थ्यांकरीता नजीकच्या काळात कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा. यासंदर्भातील सविस्तर तपशील विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in/admission-2023-2024 वर यथावकाश ठेवण्यात येत आहे.

ठिकाण:कोल्हापूर
दिनांक: २१/०४/२०२३

डॉ. व्ही. एन. शिंदे
प्र-कुलसचिव